समाजजीवन या गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी हे काव्य निश्चितच महत्त्वाचे आहे. स. म. दिवेकर यांनी या ग्रंथाचे साधनमूल्य स्पष्ट करताना म्हटले, "शिवाजी महाराजांचे विस्तृत व विश्वसनीय असे चरित्र जेव्हा भविष्यकाळात लिहिले जाईल, त्याचा गाभा 'शिवभारत' हा ग्रंथ होणार आहे."

२) अनुपुराण :- हा काव्यग्रंथ परमानंद यांनीच लिहिला आहे असे मानले जाते. परंतु टी. एस. शेजवलकर यांच्या मते, "हे काव्य परमानंदाने रचले नाही, तर त्याच्या देवदत्त या पुत्राने व नातवाने रचले आहे." या ग्रंथात भोसले कुळाचा शहाजी राजांपासून संभाजी महाराजांपर्यंतचा काव्यमय इतिहास आहे.

३) राधामाधव-विलासचंपू :- १६५३-५४ च्या सुमारास जयराम पिंडये यांनी बंगळूर येथे शहाजी राजांच्या दरबारी मुक्कामास असताना हे गद्यकाव्य लिहिले आहे. या ग्रंथातून शहाजी-पोर्तुगीज संबंध, शहाजीच्या स्वाऱ्या इ.ची माहिती मिळते.तत्कालीन राजकीय स्थिती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. भोसले हे मूळचे राजपूत असल्याचा उल्लेख या ग्रंथात आहे. शिवाजी व संभाजी यांच्यातील संबंधांचा अभ्यास करण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे.

४) पर्णालपर्वत ग्रहणाख्यान :- जयराम पिंडये यांने लिहिलेला हा ग्रंथ १९२३ साली स. म. दिवेकर यांनी प्रकाशित केला. या ग्रंथात पर्णालपर्वत म्हणजे पन्हाळ्याचे वर्णन आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळगड कसा काबीज केला याची हकीकत यात आहे. तसेच या काव्यात राजकुटुंबातील रूढी, परंपरा, चालीरीती इ.चेही वर्णन आहे.

५) शिवराज्याभिषेक कल्पतरू :- अनिरुद्ध सरस्वती या कवीने लिहिलेल्या या काव्यात एकूण २३४ श्लोक आहेत. गोविंद बर्वे व निश्चलपुरी या दोघांत शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासंबंधी जो संवाद आहे, तो त्यात आहे. शिवाजी हे क्षत्रिय नसल्याने त्यांचा राज्याभिषेक हा तांत्रिक पद्धतीनेच झाला पाहिजे असे निश्चलपुरी या ग्रंथात म्हणतो.

६) राज्यव्यवहारकोश :- शिवाजीच्या आज्ञेनुसार या ग्रंथाची रचना रघुनाथ

Scanned with OKEN Scanner

केली.

**पेशवेकालीन हकिकती सांगणाऱ्या बखरी :-** पेशवे कालखंडात बखरी मोठ्या प्रमाणात लिहिल्या गेल्या व त्यात वास्तवताही शिवकालीन बखरींशी तुलना करता जास्त दिसते. शिवकालीन प्रमुख बखरी याप्रमाणे आहेत.

१. थोरले शाहू महाराज यांची बखर

२. भट पेशवे घराण्याची हकीकत

३. नारायण पेशवे यांची बखर

४. पानिपतची बखर : रघुनाथ यादव याने ही लिहिली व त्यात पानिपतवरील मराठ्यांची कामगिरी सांगितली आहे.

५. होळकरांची कैफियत वगैरे

६. भाऊसाहेबांची बखर

७. नाना फडणवीसलिखित पानिपतचा वृत्तांत

**आज्ञापत्र :** १७१५ मध्ये रामचंद्रपंत अमात्य यांनी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात एकूण ९ प्रकरणे आहेत. त्यात राजा, त्याचे प्रधानमंडळ, व्यापार, सावकार, वतने व वतनदार, किल्ले व आरमार इ. विषयांसंबंधी विचार मांडले आहेत. रामचंद्रपंत अमात्य हे शिवाजी महाराजांच्या तालमीत वाढल्याने शिवाजी महाराजांची राजनीती ही त्यांच्या वारसांना उपयुक्त पडावी असे त्यांना वाटत होते म्हणून त्यांनी हा ग्रंथ लिहिला. शिवकालीन राजनीतीच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे साधन या नात्याने आज्ञापत्रास महत्त्वाचे स्थान आहे.

**पोवाडे व लावण्या :** मराठ्यांच्या इतिहासाचे संदर्भसाधन म्हणून पोवाडे व लावण्या यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. अज्ञानदास याचा अफझलखान पोवाडा, तुलसीदास चा 'सिंहगड' व यामाजीचा 'बाजी पासलकर' हा पोवाडा महत्त्वाचा आहे. पोवाडे व लावण्या यातून तत्कालीन समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडते.

**रोजनिशी :** १. रावबहादुर गणेश चिमाजी वाड यांनी शाहू रोजनिशी संपादित केली. असून त्यातून शाहूच्या काळातील इतिहास जाणून घेता येतो.

२. पेशव्यांच्या रोजनिशीतील महत्त्वाचे उतारे गणेश चिमाजी वाड यांनी संकलित केले आहेत. पेशवेकालीन अत्यंत उपयुक्त अशी माहिती त्यातून उपलब्ध होते.

Scanned with OKEN Scanner

४) हिंदी, राजस्थानी, कानडी साधने :-

१. **शिवराजभूषण** : हिंदी साधनांमध्ये कवी भूषणाचा 'शिवराजभूषण' हा काव्यमय ग्रंथ शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन करतो. कवी भूषण यास शिवाजी महाराजांनी आश्रय दिला होता. लाल नावाच्या हिंदी कवीचा 'छत्रप्रकाश' हा ग्रंथ छत्रसाल व शिवाजी महाराज यांच्या भेटीचे वर्णन करतो.

२. **मिर्झाराजे जयसिंगाची पत्रे** : मिर्झाराजे जयसिंग व शिवाजी महाराजांचा घनिष्ठ संबंध होता. मिर्झाराजांनी औरंगजेब व स्वत:चा पुत्र रामसिंहाला दक्षिणेतून जी पत्रे लिहिली ती राजस्थानी भाषेत असून ती मराठ्यांचा इतिहास व शिवाजींची आग्रा भेट यावर प्रकाश टाकतात.

३. **कंठीरनरसजविजयम** : शिवकालाची कानडी भाषेतून माहिती देणारे हे महत्त्वाचे साधन आहे. गोविंद वैद्य हा त्याचा लेखक असून शहाजी राजांची माहिती त्यात आहे.

४. **केळदिनृपविजयम** : लिंगप्पा याने लिहिलेल्या या ग्रंथात शिवाजी महाराजांची व शहाजींची माहिती आहे. हा ग्रंथ १७०० च्या सुमारास लिहिला गेला.

५. सर जदुनाथ सरकार यांनी काही राजस्थानी पत्रे प्रकाशित केली असून त्यातून प्रामुख्याने शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीचे वर्णन आले आहे.

५) परकीय भाषेतील साधने :-

१) **इंग्रजी भाषेतील साधने** : ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता इ. ठिकाणी वखारी होत्या. वखारीचा प्रमुख त्या त्या प्रांतांतील घटनांची नोंद ठेवत असे. त्या नोंदीतून मराठ्यांच्या मोहिमा, हालचाली, राजकारण यांची माहिती मिळते. १९३१ मध्ये पुणे येथील शिवचरित्र कार्यालयाने English Records of Shivaji हा ग्रंथ छापला. त्यात १६५९-८२ या कालखंडातील कागदपत्रे आहेत. Madras Factory Record प्रसिद्ध झाले असून त्यात मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचालींवर प्रकाश पडतो. १९२७ साली डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी Foreign Biographies of Shivaji हा ग्रंथ संपादित करून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांत मोलाची भर घातली. रॉबर्ट आर्म याने Historical Fragment हा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने शिवकाळातील घटना कागदपत्रांच्या आधारे देण्याचा प्रयत्न केला आहे. वा. सी. बेंद्रे इंग्रजी साधनांचे महत्त्व सांगताना लिहितात, " बारकाईने

Scanned with OKEN Scanner

नारायण हणमंते यांच्या देखरेखीखाली धुंडीराज लक्ष्मण व्यास या पंडिताने केली असून त्या ग्रंथावरून शिवकालीन राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थितीची माहिती मिळते.

७) राजाराम चरितम :- इ. स. १६९० साली छत्रपती राजाराम महाराजांच्या पदरी असलेल्या केशव पंडित याने हा ग्रंथ रचिला. वा. सी. बेंद्रे यांनी हा ग्रंथ १९३१ साली प्रसिद्ध केला. या ग्रंथात राजाराम महाराजांनी जिंजीला जो वेढा दिला होता त्याचे वर्णन आहे.

८) दंडनीती प्रकरण :- केशव पंडित याने लिहिलेला हा ग्रंथ मराठेकालीन न्यायसंस्थेची माहिती देतो.

९) विश्वगुण दर्शन :- व्यंकटघावरी याने १७ व्या शतकात लिहिलेल्या या ग्रंथात महाराष्ट्र ब्राह्मण, मराठा व इतर समाज यांची माहिती असून महाराष्ट्रीयन लोकांचे गुणदोषही यात दिले आहेत.

या सर्वच संस्कृत साहित्याची काही ठळक वैशिष्ट्ये दिसतात.

१. आपल्या चरित्रनायकाच्या पराक्रमाचे वर्णन अधिक रम्य व उदात्त पद्धतीने केले आहे.

२. बऱ्यावाईट गोष्टींची कारणे देताना दैववादाचा आधार त्यांनी घेतला आहे.

३. लेखक हे राजांचे आश्रित आहेत. राजांच्या आग्रहामुळेच त्यांनी ग्रंथरचना केल्या आहेत.

मराठी साधने (Marathi Sources) :-

मराठी साधने विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यात प्रामुख्याने शिवाजी, संभाजी, राजाराम, ताराबाई, शाहू महाराज व सर्व पेशवे यांची आज्ञापत्रे, वतनपत्रे, इनामपत्रे, निवाडे इ. कागदपत्रांचा त्यात समावेश होतो. तसेच पेशव्यांचे परदरबारी असलेले वकील, ठाणेदार-किल्लेदार-सुभेदार यांनी लिहिलेली पत्रे; गोतसभा, पंचायत सभा यांनी दिलेली निवाडा पत्रे इ. कागदपत्रे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

बखर वाङ्मय - प्रमुख बखरी :- स्वराज्याच्या स्थापनेपासून पेशवाईच्या शेवटपर्यंत २०० ते २५० बखरींचे लेखन झाले असावे. कोणत्या तरी राजकीय व्यक्तीच्या आज्ञेवरून त्यांचे लेखन झालेले असते. बखर वाङ्मय हे ऐतिहासिकदृष्ट्या फार विश्वसनीय साधन समजले जात नाही. म्हणूनच वि. का. राजवाडे म्हणतात, "एक अस्सल कागदाचे चिटोरे सर्व बखरींच्या बहुमतास हाणून पाडण्यास परेसे आहे."

Scanned with OKEN Scanner

माहिती मिळवून ती तपशीलवार व क्रमवार सांगण्याची इंग्रजी लोकांची पद्धती शास्त्रशुद्ध आहे. इंग्रजी दप्तरातील समकालीन साधने अस्सल आहेत.''

२. डच साधने : डचांच्या भारतात सुरत, मलबार, मच्छलीपट्टम येथे वखारी होत्या. वेंगुर्ला येथील डच व्यापाऱ्यांशी शिवाजीचा संबंध आला होता. डच लोकांनी शिवाजी, आदिलशहा यांच्याकडे आपले लोक पाठवून व्यापारविषयक बोलणी केली होती. डच लोकांचा पत्रव्यवहार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. भारतीय राजांशी जे तह, बोलणी केली त्यासंबंधीची कागदपत्रे उपलब्ध आहेत. दक्षिण कर्नाटकात डच व्यापारी अनेक वर्षे व्यापार करीत होते. वा. सी. बेंद्रे यांच्या मते, ''कालनिर्देशासाठी डच साधने उपयुक्त आहेत. डच लोकांचा स्थानिक अहवाल लिहिण्याचा परिपाठ होता. त्यासाठी ते स्वतंत्र माणूस नेमत. असे अहवाल मराठ्यांच्या इतिहासासाठी उपयुक्त आहेत.''

३. फ्रेंच साधने : इंग्रज व पोर्तुगीजांप्रमाणेच फ्रेंचांच्या अनेक ठिकाणी व्यापारी वखारी होत्या. फ्रेंचांनी मायदेशी लिहिलेली पत्रे, हिंदुस्थानातील राजांना, अधिकाऱ्यांना लिहिलेली पत्रे यांचा फ्रेंच साधनांत समावेश होतो. फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याने रोजनिशी लिहिली. ती सर जदुनाथ सरकार यांनी भाषांतरित केली. मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचालींचा अभ्यास करण्यासाठी ही रोजनिशी अत्यंत महत्त्वाची आहे. सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. हाताळकर यांनी प्रकाशित व अप्रकाशित अशा फ्रेंच कागदपत्रांचा वापर करून Relation between the French and the Marathas (1668 to 1815) हा ग्रंथ प्रकाशित केला असून तो मराठ्यांच्या इतिहासाचे महत्त्वाचे साधन आहे.

४. पोर्तुगीज साधने : भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गोवा, दमण, दीव, साष्टी इ. ठिकाणी पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. शिवाजीच्या राज्याच्या सीमा पोर्तुगीजांच्या सत्ताकेंद्राशी मिळाल्या होत्या. पोर्तुगीज व्यापारी भारतीय शासनकर्त्यांकडून व्यापारी सवलती मिळवण्याचा प्रयत्न करत. तसेच भारतातील राजकीय स्थिती, घटना यासंबंधीचे वृत्तांतही ते पत्रातून कळवत असत. पोर्तुगीज गव्हर्नरही आपल्या राजाला पत्रे पाठवत .पोर्तुगीज राजाकडूनही व्हॉइसरॉयला पत्रे येत असत. गोवा दप्तर हे ऐतिहासिक साधनांचे फार मोठे आगर आहे. कारण गोवा ही पोर्तुगीजांची राजधानी होती.

Scanned with OKEN Scanner

४) श्रीशिवछत्रपतींची ९१ कलमी बखर :- १९३० साली इतिहास संशोधक वि. स. वाकसकर यांनी ही बखर 'भारतवर्ष' या मासिकात प्रसिद्ध केली. त्यांच्या मते शिवाजीच्या अष्टप्रधानमंडळातील मंत्री दत्ताजी वाकेनविस याने ही बखर १६८६ ते १७०७ या कालावधीत लिहिली. या बखरीत मालोजीपासून ते शिवाजीच्या मृत्यूपर्यंतची माहिती दिलेली आहे. या बखरीत ९१ कलमे आहेत म्हणून ती ९१ कलमी बखर या नावाने ओळखली जाते. ही बखर इंग्रजी व फारशीतही प्रसिद्ध झाली आहे. फारशीमध्ये 'तारीख-ए-शिवाजी' म्हणून ती प्रसिद्ध आहे. धुळ्याचे प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे यांनी १९९२ मध्ये लेख लिहून या बखरीची माहिती अभ्यासकांना उपलब्ध करून दिली आहे.

५) शिवदिग्विजय :- या बखरीचा लेखक अज्ञात आहे. इतिहाससंशोधक नंदूरबारकर व दांडेकर यांनी ती संपादित करून १८९५ साली प्रसिद्ध केली. शिवचरित्रातील अनेक घटना व पराक्रम याचे वर्णन या बखरीत आहे. या बखरीत दादोजी कोंडदेवचा मृत्यू, जावळी मोहिमेची तारीख, शाहिस्तेखानाची स्वारी इ. बाबतच्या नोंदी चुकीच्या आहेत. पाल्हाळपणा हा या बखरीचा एक दोष आहे.

६) चित्रगुप्ताची बखर :- रघुनाथ यादव चित्रगुप्त (चित्रे) यांनी ही बखर १७६०-१७७० या काळात लिहिली. ही बखर म्हणजे सभासद बखरीची नक्कल होय. या बखरीत नवीन माहिती नसली तरी चित्रगुप्ताने आडनावासह अनेक कर्त्या पुरुषांचा उल्लेख या बखरीत केला आहे.

७) शिवप्रताप :- १८२९ मध्ये हा ग्रंथ लिहिला गेला. त्याचा लेखक अज्ञात आहे. या बखरीतही काही उल्लेख चुकीचे आहेत.

८) इतर बखरी :-

शेडगावकर बखर : यात भोसले घराण्याच्या शिसोदिया वंशाच्या प्रारंभीच्या राजापासून ते सातारच्या प्रतापसिंहापर्यंतचा इतिहास आहे. याही बखरीत काही नोंदी चुकीच्या आहेत.

मोरे बखर : यात शिवाजीचे व जावळीचे मोरे यांचे संबंध दिले आहेत.

दलपतरायची बखर : शिवाजी महाराजांच्या विरोधातील व्यक्तीने ही बखर लिहिली असावी. त्यामुळे शिवाजीच्या विरोधात त्या काळात जी मते होती ती समजून घेण्यासाठी या बखरीचा उपयोग होतो.

मराठी साम्राज्याची छोटी बखर : शिवचरित्रातील ...

Scanned with OKEN Scanner

१) सभासद बखर :- कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहिलेल्या या बखरीस शिवकालीन इतिहासाच्या अभ्यासाचे साधन म्हणून महत्त्व आहे. त्याने शिवाजी महाराजांचा पराक्रम पाहिला होता व ऐकलेला होता. खुद्द शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरूनच त्याने ही बखर लिहिली होती. या बखरीत काही उणीवाही दिसतात. उदा. स्थळ, काल व घटना यांचा क्रम राहिलेला दिसत नाही. या बखरीत उणीवा असल्या तरी सर्व बखरींत सभासद बखर ही अधिक प्रमाणभूत व महत्त्वाचा विश्वसनीय साधनग्रंथ आहे, असे मत सर जदुनाथ सरकार यांनी व्यक्त केले आहे. शिवाजी महाराजांचे प्रथमपासूनचे ते मृत्यूपर्यंत सर्व पराक्रम वर्णिले आहेत.

या बखरीतील माहिती इतर साधनांशी पडताळून पाहिल्यास त्यात सत्यांश आढळतो. लेखक अनंत हा राजारामाचा पक्षपाती असल्याने संभाजी महाराजांविषयी त्याने विपर्यस्त स्वरूपाची माहिती दिली आहे. राजकीय इतिहासाच्या दृष्टीने या बखरीत काही त्रुटी असल्या तरी प्रशासकीय व आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने या बखरीतील माहिती विश्वसनीय आहे यात शंका नाही.

२) चिटणीस बखर :- सातारचे छत्रपती शाहू महाराज दुसरे यांच्या पदरी असलेल्या मल्हार रामराव चिटणीस याने ही बखर १८१२ साली लिहिली. या बखरीचे लिखाण सातारच्या दप्तरखान्यातील कागदपत्रे, ऐकीव माहिती, आख्यायिका यांच्या आधारे करण्यात आले आहे. ही बखर शिवाजीच्या राज्याभिषेकापर्यंतच्या कालखंडावर प्रकाश टाकते. सभासद बखरीतील बरीचशी माहिती या बखरीत आली आहे. **वि. का. राजवाडे** म्हणतात, "या बखरीत शिवचरित्रासंबंधीची माहिती त्रोटक असली तरी ग्रँट डफच्या ग्रंथातही न सापडणाऱ्या गोष्टी या बखरीत सापडतात." ही बखर कागदपत्रे पाहून तपासून लिहिली असली तरी ती विश्वासार्ह वाटत नाही. सईबाई निंबाळकर घराण्यातील असतानाही ती शिर्के घराण्यातील होती असे चुकीचे उल्लेख त्यात आहेत. १८५७ दरम्यान या बखरीचे हस्तलिखित सापडले आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकातून ते प्रकाशित झाले.

३) संभाजी महाराजांची बखर :- मल्हार रामराव चिटणीस यांनीच ही बखर लिहिली. संभाजी महाराजांचे चरित्र सांगण्याच्या उद्देशाने ही बखर लिहिली आहे. या बखरीत अनेक सरदारांचे, व्यक्ती व घटनांचे उल्लेख आले आहेत. संभाजी महाराज व त्यांचे स्वछंदी वागणे इ.बाबत बखरीत विस्ताराने लिहिले आहे.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

९) मराठयांच्या इतिहासाची फारसी साधने :- शिवकाळात आदिलशाही, कुतुबशाही, मोगलशाही व निजामशाही ह्या मुस्लिम सत्ता अस्तित्वात होत्या. या मुस्लिम सत्तांच्या पदरी मुस्लिम इतिहासकार होते. त्यांनी लिहिलेली चरित्रे, पत्रे, बातमी पत्रे, ग्रंथ हे मराठयांच्या इतिहासाच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे साधन आहे.

१. मासिरे अलमगिरी : १७०९ साली म्हणजे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर २ वर्षांनी हा ग्रंथ मोगलांचा दरबारी अधिकारी साकी मुस्तैदखान याने लिहिला. औरंगजेब बादशहाचे हे चरित्रच होय. हा लेखक १६६२-१७०७ या काळात औरंगजेबाबरोबर दक्षिणेवरील स्वारीच्या वेळी हजर होता. या ग्रंथात त्याने अनेक घटना बिनचूक दिल्या आहेत. शिवाजी, संभाजी, राजाराम, ताराबाई, औरंगजेब यांचा अभ्यास करण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. मोगलांच्या पराक्रमांचे व विजयाचे वर्णन तो ज्या पद्धतीने करतो त्या पद्धतीने मराठयांचे पराक्रम व विजय याचे तो वर्णन करीत नाही.

२. तारिखे खाफीखान : मोगलांचा एक अधिकारी महमंद हाशिम खाफीखान याने १७३४ मध्ये हा ग्रंथ लिहिला असून त्यात औरंगजेब व त्याच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेले बहादुरशहा, जहाजशहा, फर्रुखशिअर वगैरे मोगल बादशहांचा इतिहास दिला आहे. लेखक औरंजेबाच्या दक्षिणेकडील मोहिमेच्या वेळी प्रत्यक्ष हजर असल्याने हा ग्रंथ शिवशाहीवरही अप्रत्यक्ष प्रकाश टाकतो. मराठयांना दूषणे दिली असली तरी मराठयांचे तो कौतुकही करतो. शिवाजी महाराजांची नीतिमत्ता, ताराबाईचा पराक्रम इ. गोष्टीची स्तुती खाफीखानाने केली आहे, ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे. मोगलांना दक्षिण मोहिमेत जे अपयश आले ते त्याने लिहून ठेवले आहे.

३. तारीखे दिल्कुशा : औरंगजेबाच्या पदरी असलेल्या भीमसेन सक्सेना याचे हे आत्मचरित्र असून त्यात १६५६-१७०९ पर्यंतचा इतिहासच त्याने विस्तृतपणे रेखाटला आहे. अनेक शहरांचा व त्यांच्या वैशिष्टयांचाही तो उल्लेख करतो. या ग्रंथात घटना व तारखा मागेपुढे झाल्या आहेत. त्यात शिवाजीच्या राज्याभिषेकाचा उल्लेख नाही. हे दोष मान्य करून मराठयांच्या इतिहासाच्या अभ्यासाचे एक उपयुक्त साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहावे लागते. सर जदुनाथ सरकार यांनी "Shivaji and his Time" व History of Aurangzeb" या ग्रंथासाठी या ग्रंथाचा आधार घेतला आहे.

मोगल सुभेदार दाऊदखान, महाबतखान, बहादुरखान, दिलेरखान, शहजादा मुअज्जम यांच्या पदरी भीमसेनने चाकरी केली होती. औरंगजेबाने दक्षिणेची जी मोहीम

Scanned with OKEN Scanner